वर्ष ९ वे

अंक १ ला

**‘नपुसकांचे शील आणि दुर्बलांची अहिंसा
याला मानवाच्या व्यवहारात कवडीचीही किंमत नसते.’**

- माओ




# पारनेर तालुका मित्र मंडळ, पुणे

**(रजि.नं. एफ/१४२७/पुणे, स्थापना : ०३.१२.१९७९)**

**यांचे मुखपत्र**

# संवाद

**(त्रैमासिक)**

### नियोजित वसतिगृहाची वैशिष्ट्ये

- इमारतीचे एकूण क्षेत्रफळ १२३१०.०० चौ.फुट (४ मजले - ९८४८ चौ.फूट व पार्किंग २४६२ चौ.फूट)
- बांधकामाचा एकूण अपेक्षित खर्च रु.८० लक्ष
- प्रत्येक मजल्यावर विद्यार्थ्यांसाठी ८ खोल्या व २ सेल्फ कंटेन्ड खोल्या
- खोलीचा आकार १०′ X १४′
- एकूण १२० विद्यार्थ्यांची सोय.

**ऑक्टोबर-नोव्हेंबर-डिसेंबर २००८**

फक्त सभासदांकरिता
(खाजगी वितरणासाठी)

### आपण यापैकी काय करु शकतो?

- रु.५ लक्ष व अधिक देणगी दिल्यास आपण सुचविलेले नाव एका मजल्यास दिले जाईल.
- रु.६१,००० व अधिक देणगी दिल्यास आपण सुचविलेले नाव खोलीस दिले जाईल.
- रु.५००० व अधिक देणगी दिल्यास आपण सुचविलेले नाव विशेष फलकावर लावले जाईल.

# संपादकीय


प्रिय सभासद,

आज संपादकीय आपल्यासमोर सादर करताना मी अत्यंत आनंदी आहे. दि. १० ऑगस्ट २००८ रोजी झालेल्या मित्रमंडळाच्या वसतिगृहाचे भूमीपुजन व गुणगौरव सोहळ्याच्या निमित्ताने आपण प्रचंड संख्येने उपस्थित राहिलात व मित्र मंडळाच्या कार्यकारिणीचे तसेच अनेक सभासदांचे विद्यार्थी वसतिगृह बांधकाम सुरु करण्याचे स्वप्न त्या दिवशी साकार झाले. या कार्यक्रमास स्थानिक आमदार, महापौर, नगरसेवक तसेच पारनेर तालुक्याचे आमदार श्री.विजयराव औटी हे सुद्धा उपस्थित होते. याच कार्यक्रमासाठी नगर, मुंबई व पारनेर तालुक्यातील बरेचसे हितचिंतकही आले होते. अनेक हितचिंतकांनी ५००० रुपयांपासून तर दीड लक्ष रुपयांपर्यंतच्या देणग्या कार्यक्रमामध्येच दिल्या. यावरुन पारनेर तालुका मित्र मंडळ करीत असलेले समाजकार्य सर्व जनमानसांमध्ये मिसळले असल्याचे दिसून येते. याचे श्रेय खरे तर बहुतांशी मंडळाचे अध्यक्ष शिवश्री हौसाराम घोडके यांच्या नेतृत्वालाच द्यावयास पाहिजे!


आपल्या पारनेर तालुक्यामध्ये अनेक कर्तृत्ववान मंडळी आहेत. त्यांच्या कर्तृत्वाची ओळख सर्वांना व्हावी म्हणून **'कर्तृत्त्व पारनेरकरांचे'** ही मालिका आपण 'संवाद' मध्ये सुरु केली आहे. त्यासाठी आपल्याकडून कर्तृत्ववान व्यक्तींचे लेख येणे अपेक्षित आहे. आपण तालुका घडविण्यात अग्रेसर असलो तरी तालुक्याचा इतिहास लिहिण्याच्या बाबतीत मात्र अतिशय उदासिन आहोत. ही परिस्थिती आता बदलणे गरजेचे आहे. या मालिकेस आपण उत्तम प्रतिसाद द्याल अशी अपेक्षा बाळगतो.

विद्यार्थी वसतिगृहाबाबत आपणा सर्वांना फार मोठा पल्ला गाठावयाचा आहे. संपूर्ण इमारतीसाठी सुमारे एक कोटी रुपये खर्च अपेक्षित असल्याने देणगीदारांच्या शोधार्थ मित्रमंडळाची मोहीम जारी आहेच. त्यास प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे आपली मदत व्हावी. आपल्या या सहकार्यावरच मंडळाची आर्थिक, वैचारिक, सामाजिक पातळीवरील प्रगती अवलंबून आहे, याची जाणीव ठेवून आपण तन, मन, धन यापैकी जे जे शक्य असेल, त्यासाठी पुढे यावे हीच अपेक्षा व्यक्त करतो.

जय जिजाऊ। जय शिवराय।।



**इंजि.विजयकुमार ठुबे**
संपादक

**मळगंगा बिल्डिंग अँड प्लंबिंग कॉन्ट्रॅक्टर**

*पुणे महानगरपालिका व पिंपरी चिंचवड महानगरपालिका लायसेन्स कॉन्ट्रॅक्टर*

**आर.सी.सी. व बिल्डींग कन्स्ट्रक्शनची सर्व कामे केली जातील.**
**नगरपालिकेची ऑफिशीयल कामे व एन.ओ.सी.ची सर्व कामे केली जातील.**
**वॉटर प्रुफींग, लिकेजची सर्व कामे खात्रीशीर केली जातील.**

**श्री.सदाशिव गणपत थोरात (करंदी)**
**श्री.दत्तकृपा निवास, सिंहगड कॉलनी, जवळकर नगर, पिंपळे गुरव, पुणे ४११०२७.**
**फोन :- ६५१०२५५६, ९८५०७४०१९९, ९२२५५१४२६९**

# पारनेर तालुका मित्रमंडळाच्या दि.१०.८.२००८ च्या भूमीपुजन, गुणगौरव व सर्वसाधारण सभेचा वृतांत

पारनेर तालुका मित्र मंडळ, पुणे व पारनेरकरांनी उराशी बाळगलेले स्वप्न साकार होण्याचा आनंददायी सुवर्ण प्रसंग म्हणजे विद्यार्थी वस्तीगृहाचे भूमीपुजन.




आमदार विजयराव औटी, आमदार विलास लांडे, आमदार लक्ष्मण जगताप, पिंपरी चिंचवडच्या महापौर सौ. अपर्णा ताई डोके, नगरसेवक श्रीरंग उर्फ अप्पा बारणे, मित्र मंडळाचे अध्यक्ष व सर्वेसर्वा श्री.हौसाराम घोडके, मंडळाची सर्व कार्यकारिणी, सभासद, पारनेर, नगर, मुंबईवरुन आलेली पारनेर प्रेमी मंडळी व हितचिंतकांच्या उपस्थितीत जागेवर उभारलेल्या नामफलकाचे अनावरण झाले व बांधकामासाठी वसतिगृहाच्या जागेवर कुदळ टाकून कार्यक्रमांची शानदार सुरुवात झाली. पाऊस असूनसुध्दा साधारण दोन हजार नागरीक सभागृहात उपस्थित होते.

पावसामुळे व जागेच्या कमतरतेमुळे बाकीचे सर्व कार्यक्रम जवळच असलेल्या डांगे चौकातील लक्ष्मीनारायण मंगल कार्यालयात सुरु केले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला शिवशाहीर राजेंद्र कांबळे यांच्या छत्रपती शिवाजी महाराजांवरील जोशपूर्ण पोवाड्यांनी श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले. मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलन करुन जिजाऊ वंदनानंतर कार्यक्रमास सुरुवात झाली.

सविस्तर प्रास्ताविक करतांना इंजि. **विजयकुमार ढुबे** यांनी मंडळाच्या स्थापने पासूनची वाटचाल व प्रगतीचा अहवाल श्रोत्यांपुढे ठेवला. या वाटचालीत ज्यांचे ज्यांचे योगदान मिळाले त्या सर्वांचा गौरव त्यांनी केला. तसेच मित्र मंडळाची वाटचाल नेत्रदिपक पद्धतीने चालू असल्याचे अभिमानाने सांगितले.

**श्री. विश्वनाथ कोरडे** यांनी आपल्या खास शैलीमध्ये पाहुण्यांचा परिचय करुन देताना वडील कै.यादवराव कोरडे यांचे स्मरणार्थ मंडळास **रु. एक लक्ष एक हजाराची** देणगी जाहीर केली. त्या पाठोपाठ अनेक सभासदांनी देणग्या जाहीर करण्याचा सपाटाच




लावला. **श्री. बाळासाहेब मातेरे** यांनी **रुपये एक लक्ष एक्कावन्न हजारांची** तर उद्योजक **भगवान पठारे, रंगनाथ सालके, नानासाहेब खोडदे** यांनी प्रत्येकी **एक लक्ष एक हजाराची** देणगी जाहीर केली. या शिवाय अनेक देणगीदारांनी देणग्या जाहीर केल्या व काही देणगीदारांनी त्याच ठिकाणी रोख स्वरुपात दिल्या.

**आमदार विलास लांडे** यांनी मार्गदर्शनपर भाषणात मंडळाच्या कार्याचा जाहीर गौरव केला. तसेच पारनेरकरांच्या चिकाटीचे व सामाजिक जाणीवीचे कौतुक करुन **''जिथे कमी पडेल तेथे आम्ही आहोतच''** असे आश्वासन दिले.

यानंतर रु. पन्नास हजाराच्या पेक्षा जास्त देणगी देणारांचा, विविध क्षेत्रात स्वकर्तृत्वाने चमकलेल्या





गुणवंत व्यक्तींचा, तसेच कला, क्रीडा व शैक्षणिक क्षेत्रात यश मिळविलेल्या विद्यार्थ्यांचा उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

सभासदांपैकी स्वंयस्फूर्तपणे बोललेले **नानासाहेब खोडदे** यांनी अत्यंत तडफदारपणे सांगितले की, ''पूर्वी



घोडके साहेब माझ्याकडे देणगीसाठी आले की, त्यांना द्यावयास माझ्याकडे ५० रुपये सुध्दा नसायचे परंतु आज मी **एक लक्ष रुपये** देऊ शकतो, यातच मला माझ्या आयुष्याचे सोने झाल्यासारखे वाटते. आपण सर्व पारनेरकरांनी पुण्यामध्ये येऊन माझ्यासारखे आयुष्याचे सोने करावे हीच सदिच्छा.''

**आमदार विजयराव औटी** यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात ''आपली पारनेरची माणसं जेथे जातात, तेथे आपल्या कामाचा व कर्तृत्वाचा ठसा उमठवितात व कर्तृव सिध्द करतात या शब्दात गौरव केला व त्याचे उत्तम उदाहरण म्हणजे पारनेर तालुका मित्र मंडळाचे कामकाज ! ज्या दिवशी पारनेर वरुन माझ्या मुलाचा नंबर तुमच्या वसतीगृहात लावायचा आहे, असे अनेकांचे फोन व निरोप तुम्हांस येतील तो दिवस तुमच्या आयुष्यातील धन्य दिवस असेल'' असे सांगून स्वतःची **एक लक्ष एक हजाराची** देणगी त्यांनी जाहीर केली.




या नंतर लगेच वार्षिक सर्व साधारण सभा मंडळाचे अध्यक्ष श्री.हौसाराम घोडके यांचे अध्यक्षतेखाली पार पडली. त्यामध्ये विषयवार चर्चा होवून पुढील नियोजनाची दिशा ठरवली गेली. शेवटी श्री. नरड सर यांनी आभार प्रदर्शन केले. या नंतर सर्व मंडळींनी भोजनाचा आस्वाद घेतला. सायं. ५ वाजता सुरु झालेला कार्यक्रम रात्री ९ वाजता संपला.

शब्दांकन - **भाऊसाहेब नरड**
**सुनील पोटे**







# आपण असे केले तर...

❇ **ॲड. शांतीलाल रामचंदजी गांधी** रा. पारनेर यांनी त्यांचे पिताश्री कै. रामचंदजी लच्छीरामजी गांधी यांचे स्मरणार्थ मंडळास रु. पाच हजार देणगी दिली.

❇ **श्री. नामदेव मारुती साबळे** रा. रुई छत्रपती यांनी त्यांच्या आत्या श्रीमती वासंतीबाई किसनराव क्षीरसागर यांच्या दि. १६.८.२००८ रोजीच्या सहाव्या पुण्यतिथी निमीत्त मंडळास रु. १००१/- देणगी दिली.

❇ **प्रा. जगदीश तुकाराम देंडगे** रा. गांजीभोयरे यांनी त्यांच्या मावशी श्रीमती वासंतीबाई किसनराव क्षीरसागर यांच्या दि. १६.८.२००८ रोजीच्या सहाव्या पुण्यतिथी निमीत्त मंडळास रु. १०००/- देणगी दिली.


❇ **श्रीमती विमलाबाई धनराज संचेती** रा. रुई छत्रपती यांनी त्यांचे पति कै. धनराज दगडूराम संचेती यांचे स्मरणार्थ मंडळास रु.७०००/-देणगी दिली.

❇ **श्री. संजय दिगबंर वैद्य** रा. मांडवे यांनी त्याच्या मातोश्री कै. पदमाबाई दिगबंर वैद्य यांचे दिनांक २८.७.२००८ च्या प्रथम स्मृती दिनानिमीत्त मंडळास रु. १०००/- देणगी दिली.

❇ **श्री. मलीक रहिम राजे** रा. पारनेर यांनी त्यांचे पिता श्री. पै.रहिम कुतबुद्दीन राजे यांचे स्मरणार्थ मंडळास रु.१०००/- देणगी दिली.

❇ **श्री. भाऊसाहेब भागाजी आरेकर** यांनी त्यांच्या मातोश्री कै. सौ. यमुनाबाई भागाजी आरेकर यांच्या स्मरणार्थ मंडळास रु. ५००१ /- देणगी दिली.

❇ **श्री.तुकाराम विठ्ठल नरसाळे** रा. गोरेगाव यांनी त्यांचे सुपुत्र चि. सोहम यांच्या दिनांक ४.९.२००८ च्या वाढदिवसा निमीत्त मंडळास रु. १०००/- देणगी दिली.



❇ कै. दिनकर विठ्ठलराव घोडके रा. पारनेर यांच्या दि.२१.०९.२००८ च्या दशक्रिया विधीनिमीत्त त्यांचे सुपुत्र **श्री.यशवंत व हेमंत** यांनी मंडळास रु.११०००/- देणगी दिली.

❇ **श्रीमती शैला रवीद्र कावरे** रा. सिध्देश्वर वाडी यांनी त्यांचे सासरे कै. शांताराम पांडुरंग कावरे व पिताश्री कै. बाबुराव कासार यांच्या स्मरणार्थ मंडळास रु.५०००/- देणगी दिली.

❇ **श्री. आप्पासाहेब भिकाजी पानमंद** रा. गोरेगाव यांनी त्यांचे पिताश्री कै. भिकाजी बाळाजी पानमंद यांचे स्मरणार्थ मंडळास रु. ६०००/- देणगी दिली.

❇ **श्री. विजयकुमार कुंदनमल गांधी** रा. पळशी यांनी त्यांच्या पत्नी सौ. मनिषा यांच्या दि.३१.८.२००८ च्या वाढ दिवसानिमीत्त मंडळास रु. ५०१ /- देणगी दिली.

❇ **श्री. हरिभाऊ संपतराव मुळे** रा. शेरी कासारी यांनी त्यांच्या पत्नी कै. सौ. रंजनाबाई यांच्या दिनांक १४.७.२००८ च्या प्रथम स्मृतीदिनानिमीत्त मंडळास रु.५००१/- देणगी दिली.



❇ **श्री. भाऊसाहेब गंगाराम नरड** रा.कासारे हे भारत इंग्लीश स्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, शिवाजीनगर, पुणे येथे माध्यमिक शिक्षक असून त्यांना त्याच संस्थेत पर्यवेक्षक म्हणून पदोन्नती मिळाल्याबद्दल त्यांनी मंडळास रु.१०००/- देणगी दिली.

❇ **श्री. निळकंठ झुंजारराव जगदाळे** रा.बाभुळवाडे यांनी त्यांचे चिरंजीव कु.निशांत याच्या दि.१७.०९.२००८ च्या वाढदिवसानिमीत्त मंडळास रु.१०००/- देणगी दिली.



❇ **श्री. साहेबराव रभाजी गवळी** रा.अपधूप यांनी त्यांची सुकन्या सौ. कांचन हिच्या दि. ८.७.२००८ रोजीच्या शुभविवाहानिमित्त मंडळास रु.१०००/- देणगी दिली.

## नांदा सौख्य भरे

❇ श्री. माणिकराव सिताराम ठुबे रा. कान्हूर पठार यांची सुकन्या सौ. कल्याणी व श्री. दादाभाऊ शंकर कड रा. जांबूत ता. शिरुर जिल्हा पुणे यांचे सुपुत्र चि. कैलास उर्फ नानाभाऊ यांचा शुभविवाह दि. २५.४.२००८ रोजी संपन्न झाला.

❇ श्री. साहेबराव रभाजी गवळी रा. अपधूप यांची सुकन्या सौ.कांचन व श्री. मल्हारराव कोहक रा.पुणे यांचे सुपुत्र चि.प्रसाद यांचा शुभविवाह दि. ०८.०७.२००८ रोजी संपन्न झाला.


❇ श्री. बबन गबाजी ठुबे रा. हत्तलखिंडी यांचे सुपुत्र चि.अतुल व श्री. पोपट तुकाराम पानमंद रा. जाधववाडी यांची सुकन्या सौ.ज्योती यांचा शुभविवाह दि. १०.०७.२००८ रोजी संपन्न झाला.

❇ श्री. शिवाजी मेथाजी बोरकर रा. वडझिरे यांचे सुपुत्र चि. आशिष व श्री. आनंद काशिनाथ नवले रा. पुणे यांची सुकन्या सौ. अमिता यांचा शुभविवाह दि. १८.७.२००८ रोजी संपन्न झाला.

# अभिनंदन

❋ श्री. भगवंत बळवंत क्षीरसागर रा. जामगाव हे नूतन मराठी विद्यालय पुणे येथे पर्यवेक्षक असून त्यांची शिक्षण प्रसारक मंडळ पुणे या संस्थेच्या **प्रशासकीय मंडळावर** २००८ ते २००९ साठी निवड झाली.

❋ श्री. भाऊसाहेब गंगाराम नरड रा. कासारे हे भारत इंग्लीश स्कूल पुणे येथे माध्यमिक शिक्षक असून त्यांची त्याच संस्थेत **पर्यवेक्षक** म्हणून पदोन्नती झाली आहे.



❋ कु. ओंकार प्रकाश शिंदे रा. पानोली हा इयत्ता पाचवी मध्ये असून त्याला **रिलायन्स मॅथ ऑलंपीयाड** स्पर्धेत सुवर्ण पदक मिळाले आहे.



❋ डॉ. प्रकाश पोपटराव शिंदे रा. पानोली यांची आखिल भारतीय भ्रष्टाचार निर्मुलन समितीच्या पुणे शहर शाखेत **उपाध्यक्षपदी** नेमणूक झाली आहे.

❋ पुणे विद्यापीठाच्या विद्यार्थी कल्याण मंडळाचे संचालक डॉ.प्रा.संभाजी आण्णासाहेब पठारे रा.वडुले यांना महाराष्ट्र शासनाचा **आदर्श शिक्षक** पुरस्कार प्राप्त झाला.



❋ श्री. सखाराम कोंडीबा गागरे रा. वनकुटे यांची साईबाबा नागरी सहकारी पतसंस्था सांगवी पुणे येथे **अध्यक्ष** म्हणून निवड झाली.

❋ श्री. पांडुरंग श्रीपती सालके रा. जवळे यांची **सहाय्यक पोलिस निरीक्षक** म्हणून पदोन्नती झाली.



❋ सौ. मंगला राजाराम जगदाळे रा. वासुंदे या वराळे ता. मावळ जिल्हा पुणे येथे प्राथमिक शिक्षिका असून चालू वर्षी पूर्व प्राथमिक शिष्यवृत्ती परिक्षेत त्यांच्या दहा विद्यार्थ्यांना स्कॉलरशीप मिळाल्या बद्दल त्यांना पुणे जिल्हा परिषदेतर्फे शिक्षक दिनानिमीत्त **शिष्यवृत्ती शिक्षक** पुरस्कार प्रदान करण्यात आला.

❋ श्री. सोपान रंगनाथ खोसे रा. पाडळीदर्या यांनी क्रिडा प्रबोधिनी मधून १५ राष्ट्रीय खेळाडू तयार केल्याबदल त्यांना **अजित क्रिडा पुरस्कार** मिळाला.

❋ श्री. काशिनाथ विठ्ठल आडसूळ रा. हिवरे कोरडा यांना तळेगाव दाभाडे नगरपालिकेच्या शिक्षण मंडळाने दि.५.९.२००८ **आदर्श शिक्षक** पुरस्कार प्रदान केला.



❋ श्री. पोपट बाळाजी चौधरी रा. वडझिरे यांना शिक्षक दिनानिमित्त पिंपरी चिंचवड महानगर पालिके तर्फे **''गुणवंत शिक्षक पुरस्कार''** पिंपरी चिंचवड शहर कॉंग्रेस तर्फे **द्रोणाचार्य पुरस्कार** व राष्ट्रीय बाल विज्ञान परिषद, लखनौ येथे त्यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या खाद्य तेलातील भेसळ ह्या प्रबंधाला पारितोषक मिळाल्याबदल भारतीय जैन संघटने तर्फे **विज्ञान निष्ठ** पुरस्कार मिळाला.

❋ श्री. संपत गोविंद पानसरे रा. कळस यांना पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतर्फे शिक्षक दिनी **आदर्श शिक्षक** पुरस्कार प्रदान करण्यात आला.

# दुःखद निधन

❋ श्री. पंढरीनाथ जाधव रा. पानोली यांचे दुःखद निधन दि. १४.७.२००८ रोजी झाले.

❋ श्रीमती चंद्रभागा सखाराम आंधळे रा. कर्जुले हरेश्वर यांचे दुःखद निधन दि. २७.७.२००८ रोजी झाले.

❋ श्री. संदीप आप्पासाहेब शेळके (पाटील) रा. वासुंदे यांचे दुःखद अपघाती निधन दि. ६.८.२००८ रोजी झाले.

❋ श्री. मनोज उत्तमचंद कर्नावट रा. खडकवाडी यांचे दुःखद निधन दि. १०.८.२००८ रोजी झाले.

❋ सौ. सुशीलाबाई मारुती पोटघन रा. जातेगाव यांचे दुःखद निधन दि. १७.८.२००८ रोजी झाले.

❋ श्री. बन्सीलालजी पन्नालालजी बांठीया रा. टाकळी ढोकेश्वर यांचे दुःखद निधन दि. २२.८.२००८ रोजी झाले. त्यानी संथारा व्रत घेतले होते.

❋ श्री. महादू सिताराम मोरे रा. वडझिरे यांचे दुःखद निधन दिनांक २६.८.२००८ रोजी झाले.

❋ श्री. दिनकर विठ्ठलराव घोडके रा. पारनेर यांचे दुःखद निधन दि. १२.०९.२००८ रोजी झाले.


❋ श्री. भागाजी गंगाराम आरेकर रा.किन्ही यांचे दुःखद निधन दि. १३.०९.२००८ रोजी झाले. त्यांचे वय ९६ वर्षांचे होते.

❋ श्रीमती बबई फकिरा हरेल, रा.हिवरे कोरडा यांचे दुःखद निधन दि.१७.०९.२००८ रोजी झाले.

# विश्वनाथ कोरडे - एक उमदे व्यक्तिमत्व.



विश्वनाथ कोरडे



कै.यादवराव कोरडे

श्री.विश्वनाथ कोरडे एक प्रसन्न व उमदे व्यक्तिमत्व! आज पुणे परिसरात पारनेरकर मंडळींच्या अडीअडचणींना धावून जाणारे व स्वतःचा वेळ देणारे विश्वनाथ - शाळेची, कॉलेजची ॲडमिशन असो, निरनिराळे शासकीय अगर निमशासकीय काम असो, आम्ही पारनेरकर मंडळी हमखास विश्वनाथ कडेच धाव घेतो व ते सुद्धा आमची निराशा करीत नाहीत. आज जरी विश्वनाथ यशाच्या शिखरावर दिसत असले तरी त्यांचा आत्तापर्यंतचा जीवन प्रवास थक्क करणारा आहे.

वडील कै.यादवराव कोरडे यांनी बाभुळवाडे गावात २५ वर्षे सालगडी म्हणून शेतीत काबाडकष्ट केले. नंतर गुणोरे येथेही काही वर्षे सालगडी म्हणून काम केले. परंतु कुटुंबासाठी काहीतरी करण्याच्या इर्षेने त्यांनी मुंबई गाठली. मुंबईत सुरुवातीला हमालीचे काम केले. नंतर त्यांना इंडियन टोबॅको कंपनीत नोकरी मिळाली. तुटपुंज्या पगारात भागेना म्हणून पत्नी सौ. अंजनाबाई या भाजीपाल्याचा व्यवसाय करुन कुटूंबास हातभार लावू लागल्या. साहजिकच आईला मदत करणारा थोरला विश्वनाथच. चाणाक्ष विश्वनाथला तेथेच धंद्याची दृष्टी मिळाली. आजही ते अभिमानाने सांगतात की माझ्या धंद्यातील गुरु व मार्गदर्शक आईच. या भाजी व्यवसायातूनच पैसे जमवून भोसरी येथे १९८४ साली जागा घेतली. पुढे मुंबई सोडून भोसरी येथे स्थायिक होण्याचा निर्णय कोरडे कुटुंबाने घेतला. विश्वनाथचे शालेय शिक्षण मुंबई येथे नुकतेच संपले होते. पुणे येथे आल्यानंतर आईवडीलांना व्यवसायात मदत करुन त्यांनी आपले कॉलेजचे शिक्षण पुर्ण केले. विश्वनाथ जात्याच हुशार. परिस्थितीमुळे त्याच्या शिक्षणावर अनेक बंधने आली. परंतू जिद्दीने त्याने शिक्षण पुर्ण केले. त्याकाळी हुशार विद्यार्थी म्हणून त्याचा तत्कालीन मुख्यमंत्री मा.शंकरराव चव्हाण यांचे हस्ते सत्कार झाला होता. विश्वनाथ बी.कॉम. प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाला. त्यावेळी नोकया अनेक मिळत होत्या. परंतू आईची शिकवण - कोणाचे चाकर होण्यापेक्षा धंदा केलास तर अनेकांना पोटापाण्यास लावशील म्हणून भोसरीतच भाजीपाल्याच्या व्यवसायाबरोबर किराणा मालाचे दुकान व दूध वाटपाचा व्यवसाय सुरु केला. दररोज पहाटे सायकलवर दूध टाकणे व दिवसभर किराणा मालाचे दुकान पाहणे असा दिनक्रम सुरु झाला. दुकानदारी करताना सुद्धा गिहाईकांना वाजवी दरात माल देण्याचा त्यांचा नियमच असे. त्यासाठी ते विदर्भ, मराठवाड्यात व महाराष्ट्राच्या कानाकोपयात जाऊन शेतकयांकडून माल खरेदी करत. त्यांच्या लाघवी व आर्जवी स्वभावामुळे त्यांचा व्यवसाय भरभराटीस आला.


व्यवसायात भरभराट होत असताना सुद्धा त्यांचा मूळचा पिंड सामाजिक कार्यकर्त्याचा असल्यामुळे तसेच त्यांना शिक्षणाचे महत्व कळल्यामुळे त्यांनी भोसरी मध्ये शैक्षणिक व व सामाजिक उपक्रम राबविण्यास सुरुवात केली. त्यांनी अष्टविनायक एज्युकेशन ट्रस्टची स्थापना करुन प्राथमिक ते माध्यमिक पर्यंतचे वर्ग सुरु केले. भोसरी मध्ये ही एक नावाजलेली शैक्षणिक संस्था असून प्रवेशासाठी या संस्थेत पालकांची नेहमी झुंबड असते.

या युवकाकडे राजकीय धुरीणांचे लक्ष जाणार नाही तर मग कोणाचे? आमदार विलास लांडे यांनी विश्वनाथचे नेतृत्व गुण ओळखून त्यांना सोबत घेऊन राजमाता जिजाऊ शिक्षण संस्थेची स्थापना केली. त्या वेळी सदर संस्थेचे योग्य व्यवस्थापन करणारे विश्वनाथच आहे हे त्यांनी हेरले व त्यांना संस्थेचे सचिव म्हणून निवडले. त्यावेळी त्यांच्या अनेक निकटवर्तीयांच्या भुवया वक्र झाल्या की कोण हा विश्वनाथ! पण मिळालेल्या संधीचा फायदा न घेईल तर तो विश्वनाथ कसला! थोड्याच वर्षात त्यांच्या संस्थेने आमदार साहेबांच्या मार्गदर्शनाखाली महाराष्ट्रात एक दर्जेदार संस्था म्हणून लौकीक मिळविला. आज संस्थेत निरनिराळ्या शाखांचे पोस्ट ग्रॅज्युएट पर्यंतचे शिक्षण उत्तमरित्या मिळते. याचे श्रेय सर्वजण विश्वनाथरावांनाच देतात. या शिवाय वाचन संस्कृती रुजावी म्हणून त्यांनी भोसरी मध्ये भोजापूर सार्वजनिक वाचनालयाची सुरुवात केली. शहर परिसरात त्यांचे हे काम चालू असताना सुद्धा त्यांना आपल्या गावासाठी व तालुक्यासाठी काही तरी करावे ही इच्छा स्वस्थ बसू देईना. त्यांच्या बाभूळवाडे गावातच त्यांनी शाळेसाठी व सार्वजनिक कामासाठी देणग्या दिल्या, आई श्रीमती अंजनाबाई यांचे नावे ''अंजना मेडिकल व सोशल फौंडेशनची ''स्थापना करुन त्या द्वारे शैक्षणिक व सामाजिक उपक्रम चालू केले. त्या द्वारे २००७ मध्ये चाळीस गरीब व होतकरु विदयार्थ्यांना प्रत्येकी १०००/- रु.च्या शैक्षणिक शिष्यवृत्तीचे वाटप केले. तसेच पारनेर तालुका मित्र मंडळ, पुणे या संस्थेच्या सहकार्याने इ.१०वी व १२वीच्या सुमारे ५००० विद्यार्थ्यांसाठी व्यवसायिक व शैक्षणिक मार्गदर्शन शिबिरे घेतली.

अनेक सामाजिक व शैक्षणिक उपक्रम राबविताना पारनेर तालुका मित्र मंडळाचे काम ते स्वखुशीने करीत आहेत. मंडळाच्या विद्यार्थी वसतिगृह इमारतीच्या बांधकामासाठी वडील कै. यादवराव कोरडे यांचे स्मरणार्थ त्यांनी रु. एक लक्ष एक हजार देणगी दिली. त्यांच्या भावी कार्यास शुभेच्छा!

**शब्दांकन - सुनील पोटे**

## भावपूर्ण निरोप



महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाचे विभागीय कर्मचारी अधिकारी श्री. बाळासाहेब गंगाराम सोनवणे रा.निघोज हे ३८ वर्षांच्या सेवेनंतर दि.३१.०७.२००८ रोजी सेवानिवृत्त झाले.

# -: सूचना :-

मंडळाकडे माहिती पाठविल्यास संवाद त्रैमासिकातून खालील बाबींना प्रसिद्धी देण्यात येते.

१) पुरस्कार, शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक, साहित्य, उद्योगधंदा, नोकरीतील बढती तसेच सेवानिवृत्तीची तारीख या संबंधात आपल्या किंवा आसपासच्या पारनेर तालुक्यातील व्यक्तीबाबत अवश्य कळवावे.

२) आपल्या मुलामुलींच्या तसेच नातेवाईकांच्या शुभविवाहाची बातमी संवाद मध्ये छापली जाते. त्याकरिता एक लग्नपत्रिका मंडळाच्या पत्त्यावर पाठवावी किंवा फोनने कळवावे.

३) आपल्या नातेवाईकांचे दुःखद निधन झाल्यास मंडळास अवश्य कळवावे जेणेकरुन इतर सुद्धा आपल्या दुःखात सहभागी होतील.

४) संवाद वाचून आपली प्रतिक्रिया कळवावी.

५) ज्यांनी शैक्षणिक, सामाजिक, प्रशासकीय कामामध्ये भरीव कामगिरी केली आहे अशांची माहिती फोटोसह पाठवावी.

६) विद्यार्थ्यांच्या दहावी-बारावी, इंजिनियरींग, मेडिकल व इतर सर्व शाखांच्या परीक्षांचे मार्कस् कळविल्यास विद्यार्थ्यांचे अभिनंदन संवाद मधून करण्यात येईल.

७) मंडळातर्फे वैद्यकीय मदत दिली जाते.

८) गरीब विद्यार्थ्यांना आर्थीक मदत केली जाते.

९) कृपया घरचा, नोकरीचा बदललेला पत्ता फोन नंबर त्वरीत कळवावा.

तेव्हा कंटाळा करु नका, लगेच फोन किंवा पत्राने आपली व इतरांचीसुद्धा माहिती कळवा.

संपादकीय पत्ता :
**इंजि. विजयकुमार ढुबे**
५, पिंकरोज अपार्टमेंट, विद्यासागर कॉलनी,
सॅलीसबरी पार्क, पुणे - ४११ ०३७.
फोन - २४२६३३५८, मो.- ९४२२०२६२२५

ही पत्रिका पारनेर तालुका मित्र मंडळ, पुणे साठी प्रकाशक श्री.बाजीराव झुंजारराव जगदाळे व मुद्रक श्री.सुनील तोटे यांनी मे.चैतन्य एंटरप्रायजेस, ३९५, नारायण पेठ, पुणे ४११०३० येथे छापून ए-१/१ यशोधन सोसायटी, चिंतामणीनगर भाग-२, बिबवेवाडी, पुणे - ४११०३७ येथून फक्त सभासदांसाठी प्रसिद्ध केली.
या अंकात प्रसिद्ध झालेल्या लेखांशी अथवा मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

**बुक - पोस्ट**
(छापील मजकूर)

श्रीमान ____________________

____________________

____________________

____________________

पत्रव्यवहाराचा पत्ता :
**श्री. हौसाराम घोडके**
अध्यक्ष, पारनेर तालुका मित्र मंडळ, पुणे
ए-१/१, यशोधन सोसा., चिंतामणी नगर भाग-२,
बिबवेवाडी, पुणे ४११ ०३७. मो.- ९४२०६९६७९०